(87)

११४

# नितिन गडकरी

राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी

मेल : nitingadkari@email.com | www.nitingadkari.org |

दिनांक: ०७ ऑगस्ट, २०११

श्री. ए. बी. पाटील

विषय: कोंढाणा मध्यम प्रकल्पात बदल करुन दक्षिणेकडे ७०० मीटर्स मागे घेण्याबाबत.

---

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात उल्हास नदीवर कोंढाणे गावाजवळ शासनामार्फत कोंढाणे मध्यम प्रकल्प बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. कोंढाणे प्रकल्प परिक्षेत्रात ख्रिस्तपुर्व २०० वर्षांपुर्वीची अतिप्राचीन कोंढाणे बुध्द लेणी ही जगप्रसिध्द लेणी असुन भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणाद्वारे पुरातत्त्व स्थळ म्हणुन संरक्षित केलेली आहेत. विद्यमान कोंढाणा मध्यम प्रकल्प धरण्याच्या प्रस्तावित बांधकामामुळे सदर लेण्यांकडे जाणारा रस्ता पाण्याखाली जाऊन लेण्यांशी असलेला संपर्क तुटणार आहे. परिणामी ऐतिहासीक लेण्यांना भेट देणाऱ्या देशी व परदेशी पर्यटकांची गैरसोय होणार आहे. या संदर्भात कोंढाणा परिसरातील नागरिकांनी मला प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी कोंढाणा मध्यम प्रकल्पात बदल करुन सद्यस्थितीतील प्रस्तावित धरणाचे बांधकाम दक्षिणेकडे ७०० मिटर्सच्या ठिकाणी केल्यास पाण्याखाली जाणारा रस्ता बाधित न होता लेण्यांशी पुर्वीप्रमाणे संपर्क राहणार आहे. याबाबतीत आपण विशेष लक्ष घालुन आवश्यक त्या कार्यवाईसाठी संबंधितांना आपले आदेश निर्गमित करावेत ही आग्रहाची विनंती.

आपला स्नेहांकित,

[signature]

नितीन गडकरी

प्रति,
मा. श्री. ए. बी. पाटील
सचिव, जलसंपदा विभाग
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२